# शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर, महाराष्ट्र

## दूरशिक्षण केंद्र



**बी. ए. भाग-3 : मराठी**

सत्र ५ : अभ्यासपत्रिका क्रमांक ८ DSE-E2

सत्र ६ : अभ्यासपत्रिका क्रमांक १३ DSE-E127

# मराठी भाषा व भाषाविज्ञान

(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून)

श्री. एस. आर. साळुंखे
(मराठी विभाग प्रमुख)
शंकरराव जगताप आर्टस् अँण्ड कॉमर्स
कॉलेज, वाघोली, ता. कोरेगांव जि. सातारा

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–५ अभ्यासपत्रिका क्रमांक ८ DSE-E2
सत्र–६ अभ्यासपत्रिका क्रमांक १३ DSE- E127

# मराठी भाषा व भाषाविज्ञान

बी. ए. भाग–३ : मराठी

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०२२
बी. ए. (मराठी भाषा व भाषाविज्ञान) भाग- ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता नाही.

प्रती : ३००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. एन. शिंदे
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक :
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-92887-58-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र-५ घटक क्रमांक | सत्र-६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव, ता. वाळवा | १ | – |
| **श्री. अमोल चांदेकर**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा | २ | – |
| **डॉ. डी. जे. दमामे**<br>श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | ३ | – |
| **डॉ. युवराज देवाळे**<br>कर्मवीर हिरे आर्टस, कॉमर्स, सायन्स ॲण्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | ४ | – |
| **डॉ. विनायक राऊत**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | – | १ |
| **डॉ. निलेश शेळके**<br>डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | २ |
| **डॉ. संजय साळुंखे**<br>शंकरराव जगताप आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली | – | ३ |
| **डॉ. प्रकाश दुकळे**<br>देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली | – | ४ |

■ संपादक ■

**डॉ. डी. जे. दमामे**
श्रीमती कुसूमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

**डॉ. अशोक तवर**
लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सातारा, जि. सातारा

## घटक - ३

# मराठीचे अर्थपरिवर्तन

### ३.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला;

- 'अर्थ' या संज्ञेबद्दलच्या विविध संकल्पनांचे आकलन करून घेता येईल.
- 'अर्थ' म्हणजे काय ? आणि त्याच्या व्याख्या समजावून घेता येतील.
- मराठीतील अर्थपरिवर्तनाचे स्वरूप समजावून घेता येईल.
- अर्थपरिवर्तनाची कारणे समजावून घेता येतील.
- अर्थपरिवर्तनाचे प्रकार समजावून घेता येतील.
- मराठी भाषेत अर्थपरिवर्तन कसे घडत आले, या प्रक्रियेची सोदाहरण माहिती मिळेल.

### ३.१ प्रास्ताविक

भाषा ही समाजाचा आरसा असते. समाज हा परिवर्तनशील असतो. साहजिकच भाषाही परिवर्तनशील आहे. भाषेतील परिवर्तन सूक्ष्म स्वरूपांत सातत्याने चालू असते. जी भाषा हे परिवर्तन स्वीकारून आपल्यात बदल घडविते तीच भाषा काळाच्या ओघात जिवंत राहते, टिकून राहते. अर्थात हे परिवर्तन अतिशय सूक्ष्म असते. ते हळूहळू, नकळतपणे होत असे. ते ठळकपणे निजभाषिकाच्याही चटकन लक्षात येत नाही. सर्वसामान्यतः हे परिवर्तन दोन पातळ्यांवर घडते. पहिली पातळी म्हणजे भाषेच्या बाह्यरूपात हे परिवर्तन दिसून आले की, त्याला **ध्वनिपरिवर्तन** म्हणतात. दुसऱ्या पातळीवर भाषेच्या अंतरंगात म्हणजे शब्दांच्या अर्थात परिवर्तन घडून आले की, त्याला **अर्थपरिवर्तन** म्हणतात. भाषेत बदल होणे, तिच्यात परिवर्तन होणे हे भाषेच्या जिवंतपणाचे, टिकून राहण्याचे लक्षण आहे. हा बदल भाषेच्या उच्चारात आणि तिचा आत्मा म्हणजे शब्दाच्या अर्थात होतो. एखादा शब्द एखाद्या विशिष्ट काळात एका विशिष्ट अर्थाने वापरला जात असला, तरी कालांतराने त्याच्या अर्थात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शब्दांच्या अर्थात होणारे बदल म्हणजेच अर्थपरिवर्तन होय. ही प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असते. या प्रक्रियेच्या मुळाशी निजभाषिकाची मानसिकताच बऱ्याच प्रमाणात कारणीभूत असते. त्यामुळे